# KANPUR PHILOSOPHERS

ISSN 2348-8301

International Journal of Humanities, Law and Social Sciences Published Biannually by New Archaeological & Genological Society Kanpur India

Vol. VIII, Issue-I, 2021

# Kanpur Philosophers

Biannual Journal of
New Archaeological & Genological Society

**Chief Editor**
**Atul Kumar Shukla**, Banda India

**Assistant Editors & Referees**
**Purushottam Singh**, Kanpur India
**Akhtar Hussain Sandhu**, Lahore Pakistan
**Kuljit Singh**, Jammu India
**Balaji Chirade**, Nanded India
**Neha Singh**, Kanpur India
**Vasudev Singh**, Houston U.S.A.
**Adesh Gupta**, Banda India
**Fatimatuzzahra Rahman**, Dhaka Bangladesh

Review & Advisory Board
**Rajendra Singh** , Jhansi India
**Raj Kumar Bhatiya**, Jhansi India
**U.P. Arora** , New Delhi India
**Sugam Anand**, Agra India
**Aroop Chakravarti**, Lucknow India
**Umakanta Mishra**, cuttack India
**J. Shunmugaraja**, Madurai India
**Rafida Nawaz**, Multan Pakistan
**Enayatullah Khan**, Aligarh India
**Ajmal Mueen M A**, Mokkam, Calicut India
**Farzand Masih**, Lahore Pakistan
**R. Mahalakshmi**, New Delhi India
**Randall Law**, Sydney Australia
**Pranjol Protim Kakoti**, Golaghat India

Publisher
Secretary NAAGS Kanpur Chapter India

ISSN 2348 – 8301

# Kanpur Philosophers

Volume VIII, Issue I, June 2021

**An UGC Care Listed, Internationally Peer Reviewed and Refereed Journal of History, Archaeology, Indology, Epigraphy, Numismatics, Law, Literature & allied disciplines of Arts, Humanities and Social Sciences.**

**NEW ARCHAEOLOGICAL & GENOLOGICAL SOCIETY**
125/L/89, FF104, GOVIND NAGAR, KANPUR U.P. INDIA 208006

# Index

## Kanpur Philosophers Volume-VIII, Issue-I, January – June 2021


| Sr. No. | Title | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद | प्रा. प्रज्ञा काषिनाथ कांबळे. षिरगांवकर | 1 |
| 2. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता | प्रा.डॉ.आंदे लता दिगंबर | 5 |
| 3. | भूमी आणि स्त्री ; वर्ग–धर्मपूर्व लोकसंस्कृती व कृषिप्रधान तंत्रसाधना | प्रा. रामचंद्र गुर्लिग घुले | 9 |
| 4. | चॉईस बेस्ड् क्रेडिट सिस्टीममुळे उच्च शिक्षणात झालेल्या बदलांचा लेखाजोखा व फलश्रुती | डॉ. एस. आर.कट्टीमनी | 21 |
| 5. | 'भेड़ियों ने कहा शुभरात्रि' कविता–संग्रह में अभिव्यक्त मानवीय मूल्यहीनता | डॉ. प्रवीणकुमार न. चौगुले | 28 |
| 6. | प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे व्यावसायिक ताणाचा अभ्यास | Indrajeet Vijaysinh Patil | 35 |
| 7. | जीवन के यथार्थ का चित्रण करने वाला नाटक | डॅा वर्षा गायकवाड | 46 |
| 8. | सायबर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण व सामाजिक सुरक्षितताः एक समाजशास्त्रीय अध्ययन | श्री. ससाणे जगदीश केशवराव | 50 |
| 9. | प्रजासत्ताक ते फॅसिझम (स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलती लोकशाही ) | प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश | 58 |
| 10 | संत साहित्यातील मानवतावाद : स्त्रीशुद्रांच्या विशेषसंदर्भात | प्रा.मानिषा श्रेणिककुमार पाटील | 66 |
| 11 | नॅकच्या चक्रव्यूहात महाविद्यालयांचे मूल्यांकन | प्राचार्य डॉ. संजीव लाटे | 71 |
| 12 | सुक्ष्मवित्तपुरवठ्याची ग्रामीण क्षेत्राच्या आर्थिक प्रगतीत भूमिका | प्रा. सुरेश जोति पाटील | 78 |

*Kanpur Philosophers*
*ISSN 2348-8301*
*International Journal of humanities, Law and Social Sciences*
*Published biannually by New Archaeological & Genological Society*
*Kanpur India*

NAAGS KANPUR

*Vol. VIII, Issue I (Summer) 2021*

# चॉईस बेस्ड् क्रेडिट सिस्टीममुळे उच्च शिक्षणात झालेल्या बदलांचा लेखाजोखा व फलश्रुती

**डॉ. एस. आर.कट्टीमनी,**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग ,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ संलग्नित, महाराष्ट्र,

**घोषवारा :**

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. यामध्ये मानव ज्ञानाची देवाण-घेवाण करून आपल्या भौतिक संसाधनांचा विकास घडवत आहे. भारताच्या वाढीव लोकसंख्येला भारतीय पारंपरिक शिक्षण हे संपूर्ण रोजगार उपलब्ध करून देऊ शकत नाही ही शोकांतिका आहे .कारण शाळांच्या वर्ग खोल्यांमध्ये शिकवले जाणारे शिक्षण व रोजगारासाठी आवश्यक असणारे कौशल्य यामध्ये तफावत असल्याने हे शिक्षण विद्यार्थ्यांना रोजगाराप्रत घेऊन जाऊ शकत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यार्थीकेंद्री, विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणारे, त्यांच्या कलागुणांची जोपासणारी करणारे, समाजाभिमुख, कौशल्यभिमुख व रोजगाराभिमुख शिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सी बी सी एस या प्रणालीचा वापर अवलंब केला गेला आहे.

भारतीय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी व जागतिक मानांकनामध्ये भारतीय उच्च शिक्षणाचे महत्त्व वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना केंद्रीभूत मानून चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यामध्ये संपूर्ण देशातील कोणत्याही विद्यापीठातील, कोणत्याही कॉलेजमध्ये, कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षण घेता येणार आहे. त्याला विषयांचे बंधन नसणार आहे. प्रस्तुत शोध निबंधाद्वारे सीबीसीएस अर्थातच चॉईस बेस्ड् क्रेडिट सिस्टीमच्या काही पैलूंवर प्रकाश टाकला जाणार आहे. तसेच

सीबीसीएस राबवत असताना येणाऱ्या अडचणी, होणारे समज-गैरसमज व उपाय यांचेही विवेचन केले जाणार आहे.

**कळीचे शब्द :** संसाधन, पारंपरिक शिक्षण, समाजाभिमुख, रोजगाराभिमुख, विद्यार्थीकेंद्री, सी बी सी एस...

**प्रस्तावना:**

1990 हे वर्ष भारताने 'निरक्षरता निर्मूलन वर्ष ' म्हणून जाहीर केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने उच्च शिक्षणासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत. उच्च शिक्षण व संशोधनाचा दर्जा सुधारावा यासाठी यूजीसीने अनेक प्रयत्न केले आहेत.

सीबीसीएस पद्धतीद्वारे भारतातील सर्व राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांना म्हणजेच सर्व क्रेडिट ची मोजणी गुणांकनासाठी मान्य केली जाते. सीबीसीएस प्रणालीचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा विषय व कल तपासून विषय अभ्यासास मिळणे ही चांगली बाब असून अनेक मोठ्या महाविद्यालयांमध्ये आर्ट्स, कॉमर्स, सायन्स व मल्टीफॅकल्टी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या आवडीचा विषय देणे शक्य होते. येथे आंतरविद्याशाखीय अभ्यास देखील मुलांचा व्यवस्थितपणे होऊ शकतो. सातत्यपूर्ण मूल्यमापनाचा विचार करता सीबीसीएस प्रणालीद्वारे अंतर्गत मूल्यमापन व इतर मूल्यमापनाच्या निकषांचा वापर करून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचा आदर ठेवून त्याचेही मूल्यमापन केले जाते.

कॉफी पिताना कोणती कॉफी प्यायची हे मेनु कार्ड द्वारे आपल्याला समजते तसे विद्यार्थ्यांना विषय व शाखा सीबीसीएस प्रणालीद्वारे आता निवडता येते. विद्यापीठांना आता असे विविध विषय शिकण्याचे पर्याय विद्यार्थ्यांना देण्याचे बंधनकारक आहे. म्हणजेच विद्यापीठ किंवा स्वायत्त महाविद्यालये आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या शिक्षक, तंत्रज्ञान व साधनाद्वारे विद्यार्थ्यांपुढे विषय निवडीचे स्वातंत्र्य देऊ शकतात.

भारतीय उच्च शिक्षण संस्थांना चांगले जागतिक स्तरावरील मानांकन व गुणांकन प्राप्त व्हावे. भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेचा दर्जा जागतिक सुपरिचित विद्यापीठांसारखा सुधारावा यासाठी युजीसी द्वारे नानाविध प्रयोग व बदल उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये केले जात आहेत. सध्या भारताच्या सर्वच विद्यापीठांमध्ये व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये परीक्षा प्रणाली अंतर्गत बदल होऊन मार्कांऐवजी क्रेडिट पद्धतीने गुणांकन करण्याचे अवलंबले गेले आहे. भारतीय विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषांच्या अडचणीमुळे व स्थानिक प्रवृत्तींना लक्षात घेऊन अभ्यामक्रम बनवल्यामुळे विद्यार्थी केंद्री अभ्यासक्रम क्वचितच दिसून येतो. एकविसाव्या शतकाचे आव्हाने लक्षात घेता भारतातील कोणत्याही शहरी, ग्रामीण, दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे व व्यवसायाभिमुख, कौशल्ययुक्त अभ्यासक्रम शिकायला मिळावा यासाठी म्हणून चॉइस ब्रेस्ड क्रेडिट सिस्टम ची आवश्यकता भारतासारख्या विकसनशील देशाला आहे.

**विद्यार्थी केंद्री शिक्षण व्यवस्था:**

(CBCS) प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना कोअर कोर्स, इलेक्टिव कोर्स, सॉफ्ट स्किल कोर्स, जेनेरिक इलेक्टीव्ह कोर्स या व अशा विषयांची निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. सीबीसीएस द्वारे विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीनुसार, गरजेनुसार कोणत्याही विषय निवडीचे तसेच आंतरविद्याशाखीय व बहुविद्या शाखीय विषय निवडीचे व अभ्यासाचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे.

**विद्यापीठ / महाविद्यालयातील बदल :**

सीबीसीएस पद्धतीमध्ये एखादा विद्यार्थी एकच पदवी/ पदव्युत्तर पदवी दोन अथवा तीन विद्यापीठातून किंवा महाविद्यालयातून स्वतःच्या आवडीनुसार, विषय तज्ञाच्या उपलब्धतेनुसार किंवा उपजीविकेच्या गरजांनुसार पूर्ण करू शकतो. उदाहरणार्थ. समजा एका विद्यार्थ्याने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील संलग्नित महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागामध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आहे. परंतु प्रथम सत्राच्या समाप्तीनंतर समजा त्याला काही अडचणी आल्या व हैदराबाद येथील सेंट्रल युनिव्हर्सिटी मध्ये बी.ए मधील एखादा विषय त्यासोबत शिकण्याची त्याची गरज/ आवड असेल तर त्याला पारंपारिक म्हणजेच अगोदरच्या शिक्षणपद्धतीमध्ये हे स्वातंत्र्य नव्हते. परंतु सीबीसीएस प्रणालीद्वारे हे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना मिळाले आहे. पदवीचे एकूण सहा सेमिस्टर वेगवेगळ्या राज्याच्या विद्यापीठातून देऊन त्याचबरोबर स्वयम् प्लॅटफॉर्म वरील स्वयं अध्ययनाचे मॅसीव्ह ऑनलाईन ओपन कोर्सेस शिकून त्याचे जास्तीचे क्रेडिट्स मिळवण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना या प्रणालीद्वारे मिळाले आहे.

**परीक्षा पद्धती मधील सुधारणा :**

सीबीसीएस प्रणालीद्वारे विद्यार्थी एका महाविद्यालयातून काही क्रेडिट प्राप्त करून परत दुसऱ्या राज्यातील इतर महाविद्यालयांमध्ये प्रवेशित होऊन क्रेडिट प्राप्त करू शकतो तसेच अगोदर चे क्रेडिट्स ग्राह्य धरून ते ट्रान्सफर केले जातात.

पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या मध्ये अशी लवचिकता क्वचितच आढळून येते. दुरस्थ/ बहिस्थ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच काम करत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन ते पाच वर्षात पदवी पूर्ण करावी असे वेळेचे बंधन ही सीबीसीएस मध्ये नाही.

हुशार विद्यार्थ्यांना एकाच प्रकारचे ज्ञान मिळवताना तोचतोपणाने आळस येण्याची संभावना आहे त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाद्वारे विविध ऑनलाईन कोर्स अभ्यासून, स्वयम् अध्यायनद्वारे जादाचे क्रेडिट पूर्ण करण्याची संधी आहे.

**इतर कलागुणांना गुणांकन :**

पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये नवसृजन / नवनिर्मिती व दृश्यश्राव्य कलाना म्हणजेच संगीत, नृत्य , गायन, वादन या व यासारख्या कलागुणांना गुणांकन दिले गेले नव्हते. सीबीसीएस प्रणालीमध्ये या विविध गुण प्रदर्शनांच्या कला, क्रीडा, साहित्य, संगीत, स्थापत्य व राष्ट्रीय सेवा योजना सारख्या समाजोपयोगी उपक्रमांना

क्रेडिट्स देऊन प्रोत्साहित केले गेले आहे. त्यामुळे निश्चितच तरुण पिढी या कलागुणांच्या विकासाकडे लक्ष देईल व देशाचा सांस्कृतिक विकास होईल असा आशावाद निर्माण झाला आहे.

**सीबीसीएस व शिक्षणातील उदारीकरण :**

सीबीसीएस ही एक आंतरराष्ट्रीय शैक्षणिक प्रणाली असून आंतरविद्याशाखीय तसेच बहुविद्याशाखीय विषय निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना बहाल केले आहे. वेगवेगळ्या विद्याशाखांच्या ज्ञानास व उपयुक्ततेस एकमेकांशी जोडण्याचे काम सीबीसीएस प्रणालीद्वारे केले गेले आहे. सीबीसीएस प्रणालीद्वारे जागतिकीकरण व उदारीकरण उच्च शिक्षणामध्ये रुजवण्याचे काम यूजीसी व एम. एच. आर. डी. यांनी केलेले दिसून येते.

पुढील काही कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी भारतामधील शैक्षणिक संस्थांमध्ये मिळवलेले क्रेडिट जागतिक विद्यापीठांबरोबर संलग्न करून हे क्रेडिट ट्रान्सफर करण्याची व्यवस्था कार्यान्वित करण्याची यूजीसी तयारी करत आहे .

**सीबीसीएस प्रणाली ची वैशिष्ट्ये :**

भारतातील सर्व राज्यांमधील विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये सीबीसीएस प्रणाली ही सन २०१५ पासून सारख्या प्रमाणात लागू झाली आहे. सीबीसीएस प्रणालीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सीबीसीएस प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आवडी व स्थानिक गरजा लक्षात घेऊन  नॉन क्रेडिट कोर्स विद्यार्थ्यांना अभ्यासण्यास दिली जातात ज्यांच्या यशस्वीपूर्ण समाप्तीनंतर समाधानकारक किंवा असमाधानकारक असा शेरा सर्टिफिकेटवर दिला जातो. ज्यांच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना जीवनावश्यक अभ्यासाचे ज्ञान व कौशल्य मिळते.

२. सीबीसीएस प्रणालीमध्ये विद्यार्थ्याने पदवी काळात स्वयं अध्ययनाद्वारे प्राप्त केलेल्या ऑनलाईन कोर्सच्या व परीक्षा देऊन महाविद्यालयातून प्राप्त केलेल्या क्रेडीटची बेरीज केली जाते व क्रेडिट्स व ग्रेड विद्यार्थ्यांना प्राप्त होतात.

३. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार विषय निवडीचे स्वातंत्र्य, त्यातील काठिण्यपातळी नुसार सर्टिफिकेट कोर्सेस, डिप्लोमा कोर्सेस व डिग्री कोर्सेस निवडण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना सीबीसीएस प्रणालीद्वारे दिला गेला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांच्या विषय ज्ञानामध्ये व कौशल्यांमध्ये सकारात्मक व योग्य ते बदल घडवता यावा हा उद्देश आहे.

४. सीबीसीएस प्रणालीद्वारे आंतरविद्याशाखीय व बहूविद्याशाखीय अभ्यास विद्यार्थ्यांना एकाच महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून दिले गेले आहे.

५. इलेक्टिव कोर्सेस द्वारे ज्ञानवृद्धीसाठी व कौशल्यांच्या विकासासाठी तसेच सामाजिक जाणीवा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रमास पूरक असे प्रकल्प कार्य विद्यार्थ्यांना दिले जाते. यावेळी शिक्षकाचे मार्गदर्शन घेऊन विद्यार्थी प्रत्यक्ष जीवनावश्यक ज्ञानाचे उपयोजन प्रकल्प अभ्यासाद्वारे करतो.

६. एकच विषय न शिकता अनेक विषयाचे ज्ञान घेऊन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव या प्रणालीद्वारे देता येतो.उदाहरणार्थ इतिहासाच्या विद्यार्थ्याला भूगर्भशास्त्र विषयाचा अभ्यास लेण्यांच्या अभ्यासासाठी करता येईल.

७. ए ई सी सी AECC म्हणजेच Ability Enhancement Course ज्यामध्ये पर्यावरण विज्ञान, इंग्रजी व MIL Communication या विषयांचा समावेश होतो. ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत करण्यासाठी या विषयांची आवश्यकता असते. या अनिवार्य विषयांच्या सक्तीमुळे विद्यार्थ्यांच्या एकूणच ज्ञानात भर पडते.

**सीबीसीएस राबवत असताना येणाऱ्या समस्या:**

- पुरेशा शिक्षकांचा अभाव
- पुरेशा भौतिक सुविधांचा अभाव
- जागेची व आर्थिक अडचण
- सिंगल फॅकल्टी कॉलेजमध्ये आंतरविद्याशाखीय विषय विद्यार्थ्यांना शिकवताना येणाऱ्या अडचणी
- विद्यार्थ्यांना त्यांची आवड व कलागुणांना जोपासता येण्यासाठी क्रेडिट देताना येणाऱ्या अडचणी
- हजेरीची सक्ती केल्याने नियमित शिक्षणापेक्षा बहिस्त शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा वाढलेला कल.
- स्वायत्त महाविद्यालयांमधील क्रेडिटचा गोंधळ

या व अशा अनेक अडचणींना सीवीसीएस मुळे तोंड द्यावे लागत आहे.

**सीबीसीएस प्रणालीचे तोटे :**

- विद्यार्थ्यांना तीन वर्षांमध्ये जास्तीत जास्त कौशल्य व क्रेडीट देण्यामध्ये गोंधळ निर्माण होण्याची परिस्थिती उद्भवते. मुळातच बहुतांशी प्राध्यापक व विद्यार्थी तसेच क्लार्क / लिपिक लोकांना सीबीसीएस प्रणालीचे आकलन झाले नसते त्यामुळे क्रेडिट्स, गुण, स्किल्स व विविध कोर्स यांच्या तील अनेक अडचणी सगळ्यांनाच येतात. या अडचणींचे निरसन विद्यापीठ किंवा विद्यापीठ अनुदान आयोग/ यूजीसी यांच्याकडून व्यवस्थित पुणे केले जात नाही.
- वेगवेगळे कोर्सेस आंतरविद्याशाखीय मुलांसाठी खूले करताना वर्कलोड चे व कामाच्या वेळा चे नियोजन करणे अवघड बनते. हे सर्व करत असताना अनेकदा एखाद्या विशिष्ट विषयाला विद्यार्थी संख्या कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तेव्हा शिक्षक -विद्यार्थी प्रमाणाचा विचार केले जाते.
- एकाच कॅम्पसमध्ये सर्व प्रकारचे कोर्सेस चालत नसतात तेव्हा आंतरविद्याशाखीय अभ्यासास मर्यादा येतात.
- विद्यार्थ्याने प्रथम वर्षापासून ऑनलाईन व ऑफलाईन असे अन्य काही कोर्स करून इतर क्रेडिट कमावले असतील तर त्याची नोंद तृतीय वर्षानंतर कोणत्या मार्कशीट वर केली जाणार? पदवी प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्याने सर्व विद्यापीठांमध्ये एकूण तीन वर्षात कमवलेल्या सर्व क्रेडिट चा विचार न केल्या जाण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. या सर्वांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

**सीबीसीएस प्रभावीपणे राबवण्यासाठीचे उपाय:**

देशभरातून कोणत्याही विद्यापीठांमधील कोणत्याही महाविद्यालयात शिक्षण घेता येईल अशी ही व्यवस्था सीबीसीएस द्वारे विद्यार्थ्यांसाठी निर्माण केली गेली आहे.यात वरील प्रमाणे काही अडचणी असल्या तरी देखील त्यात सुधारणा होणे शक्य आहे.

- स्वायत्त महाविद्यालयांच्या क्रेडिट गुणांची तपासणी यूजीसीच्या कमिटी द्वारे किंवा नॅक व तत्सम संस्थेद्वारे होणे आवश्यक आहे. त्यामध्ये एकवाक्यता येणे ही देखील गरजेचे आहे.
- स्थळपरत्वे , काळापरत्वे अभ्यासक्रमात बदल करण्याचा स्वायत्त महाविद्यालयांना अधिकार दिला असला तरी त्याची तपासणी देखील काटेकोरपणे वरील संस्थांद्वारे होणे आवश्यक आहे.
- अनेक पारंपारिक महाविद्यालयांमध्ये सीबीसीएस च्या नावाखाली विद्यापीठाने दिलेल्या पारंपारिक अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना हवे ते विषय दिले जात नाहीत.प्रवेश कमिटीच्या द्वारे विद्यार्थ्यांचे प्रवेश व विषय निश्चित केले जातात. विद्यार्थ्यांची आवड न जोपासता फक्त काही विषय व प्राध्यापकांच्या नोकऱ्या वाचविण्यासाठी म्हणून प्रवेश कमिटी द्वारे विद्यार्थ्यांच्या आवडीचे व त्यांना हवे असणारे विषय दिले जात नाहीत. विद्यार्थ्यांना हवा तो विषय न मिळाल्यामुळे पुढे त्यांना शिक्षणामध्ये रस ही राहत नाही व ते शिक्षणापासून दूर होतात. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाच्या प्रवेश समितीबाबत चे कार्य विद्यापीठांनी व उपरोक्त संस्थांनी काटेकोरपणे तपासून पहावे जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा विषय मिळेल व त्यामध्ये ते स्वतःचे करिअर घडवतील.
- अनेक विद्यापीठांमध्ये पारंपारिक मार्क पद्धतीचेच रूपांतर क्रेडिट सिस्टीम मध्ये करण्यात आले आहे. यामध्ये फक्त मार्कशीट मध्येच बदल दिसून येतात. सीबीसीएस प्रणाली खरोखरच उच्च शिक्षणामध्ये योग्य प्रकारे राबवायची झाल्यास याबाबत प्राध्यापकांना सर्वप्रथम याचे महत्व व संकल्पना समजावून सांगणे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास प्रवृत्त करणे ह्या बाबी महत्त्वाच्या आहेत.

**मूल्यमापन :**

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, एक सुजाण भारतीय नागरिक म्हणून नैतिक कल्पना, जीवन विषयक मूल्य रुजवायची झाल्यास खरोखरच सीबीसीएस प्रणाली ही एक महत्त्वाचे माध्यम आहे. पण ती न समजून घेता अपुऱ्या ज्ञानाच्या अभावी किंवा वैयक्तिक स्वार्थामुळे काही प्राध्यापक व महाविद्यालयांनी सीबीसीएम प्रणालीचे चुकीचे वापर केल्याचे दिसून येते. या चुका दुरुस्त केल्या व सीबीसीएस प्रणाली राबवलेल्याचे योग्य प्रकारे मूल्यमापन उपरोक्त नॅक, एन बी ए , यूजीसी या व अशा संस्थांद्वारे झाल्यास सीबीसीएस प्रणाली ही नक्कीच भारतीय शिक्षणाला वरदान ठरेल. तसेच भारतीय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी चे एक महत्त्वाचे साधन म्हणून ही सीबीसीएस प्रणालीचा वापर होईल.

सीबीसीएस प्रणालीतील सत्र पद्धती व परीक्षा पद्धती मध्ये शिथीलता आल्याचे दिसून येते. सीबीसीएस परीक्षा पद्धती मधील महत्त्वाचा दोष म्हणजे ज्ञानाची पातळी झोखणारी राहिली नसून केवळ

स्मरणशक्तीची कसोटी तोलणारी परीक्षा ठरत आहे. जास्तीत जास्त क्रेडीट देण्याच्या व घेण्याच्या विद्यार्थी व महाविद्यालयाच्या प्रवृत्तीमुळे निकाल पत्रिकेमध्ये गोंधळ होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा हा दाखला बौद्धिक क्षमता सिद्ध करणारा ठरत असल्याने विविध ठिकाणच्या नोकऱ्यांमध्ये आपली बौद्धिक क्षमता स्वतंत्र परीक्षांच्या द्वारे त्यांना सिद्ध करावी लागते, म्हणूनच या परीक्षेच्या बाबतीत पुनर्विचार करून नियमावली घालून देण्याची गरज आहे.

असे असले तरीही विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शॉर्ट टर्म कोर्सेस, सर्टिफिकेट कोर्सेस, व्हॅल्यू अॅडेड कोर्सेस, डिप्लोमा कोर्सेस, मूक कोर्सेस व स्वयंमच्या प्लॅटफॉर्मवरील कोर्सेस द्वारे सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा सीबीसी एस चा कल असलेला दिसून येतो. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व तो अद्ययावत ठेवण्यासाठी या कोर्सेसची आवश्यकता आहे.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचा संबंध भारताच्या भवितव्याशी संबंधित असल्याने ही गुणवत्ता विकसित करण्यासाठी चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम जास्तीत जास्त सबळ करणे गरजेचे आहे. ज्याद्वारे औद्योगिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांच्या बदलत्या व्यावसायिक गरजांना सामोरे ठेवुन अभ्यासक्रम व अध्ययन पद्धती ठरवता येईल.तसेच उपयोजित शिक्षण पद्धती द्वारे उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारला जाईल

**संदर्भ साधने :**


1. डॉक्टर लक्ष्मण महामने (२०१०) , महाविद्यालय समग्र गुणवत्ता व्यवस्थापन, प्रीतम प्रकाशन , पुणे
2. Jagannath Mohanty (2004), Modern trends in Indian education, second revised edition, Deep and Deep Publication, New Delhi.
3. प्रा. सुधाकर मानकर (२०१०), यूजीसी रेगुलेशन्स हॅन्डबूक, मे अतुल पब्लिकेशन्स, कोल्हापूर
4. डॉ. व्ही. एच. देशपांडे (२००५), नॅक : पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयाचे प्रशासन, सुखदा सौरभ प्रकाशन, पाटण
5. ले. व्ही एम शेवाळे (२००५), महाविद्यालय कार्यालयीन कामकाज, डायमंड पब्लिकेशन, पुणे
6. प्र. य दातार (२००१), उच्च माध्यमिक शाळा-कनिष्ठ महाविद्यालय नियम पुस्तक, श्री मंगेश प्रकाशन नागपूर
7. Antony Stella & A. Gnanam (2003), foundations of external quality assurance in Indian higher Education, concept publishing company, New Delhi
8. Dr S N Please (2005), quality improvement programme in higher education through NAAC , A success story of Maharashtra, Intellectual book bureau, Bhopal.